RNI-MAHMAR
36829-2010

ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay


International Research Journal

UGC-CARE LISTED

## Folk Literature & Folk Media

FEBRUARY 2020







Executive Editor : Dr. Subash Nikam

Principal,
Mahatma Gandhi Vidymandir's
Karmaveer Bhausaheb Hiray
Arts, Science and Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon Dist. Nasik (MS)



Co- Editor : Prof. Arjun G. Nerkar



Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi



Address : 'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist. Latur 413515

| | | |
|---|---|---|
| 52 | लोकसाहित्य आणि समाजप्रबोधन<br>प्रा.योगिता बी. भामरे (मराठी विभाग) | 200-204 |
| 53 | लोकसाहित्य व समाजजीवन<br>डॉ. स्नेहल संजय मराठे | 205-207 |
| 54 | लोकसाहित्य अभ्यासाचा इतिहास<br>प्रा.डॉ.कांत वसंतराव जाधव | 208-212 |
| 55 | महाराष्ट्रातील लोककलेचा भौगोलिक अभ्यास विशेष संदर्भ "बोहाडा" लोककला<br>डॉ. सुनील अशोक देवरे, डॉ. एस. व्ही. ताठे | 213-216 |

# लोकसाहित्य व समाजजीवन

**डॉ. स्नेहल संजय गराठे**
सहाय्यक प्राध्यापक
श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, मालेगाव कॅम्प मालेगाव (नाशिक)

**प्रस्तावना .**

लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा वारसा आहे. सांस्कृतिक पिढ्यान पिढ्या लोकसाहित्यातून संक्रमित झाली आहेत. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांच्या अभ्यासांची समरूप व्याप्ती लक्षात घेऊन लोकसाहित्याचा अभ्यास अनेक आंतरविद्याशाखीय संशोधन क्षेत्राचा शोध आहे. हे डॉ. तारा भवाळकरांसारख्या अभ्यासकांनी समर्थपणे दाखवून दिले आणि लोकसाहित्याच्या या क्षेत्राची व्याप्ती विस्तृत केली. त्या लिहितात, "कोणत्याही संस्कृतीचा सर्वांगीण अभ्यास लोकजीवनातील, लोक परंपरेतील सर्व शब्द साहित्य (कथा– गाथा, गीते, म्हणी, उखाणे इ.) सर्व प्रकारच्या धर्मश्रद्धा, विधाने, समजुती, चालीरीती, रूढी, लोकभ्रम, अन्न, वस्त्र, दैनंदिन जीवनात परंपरेने आलेल्या सर्व वस्तू, साकल्याने अभ्यास करण्यासाठी इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र, पुरातत्वशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र, दैवतकथाशास्त्र या सर्व शास्त्रांचा प्रसंगपरत्वे उपयोग केल्याखेरीज या अभ्यासाला परिपूर्णता येत नाही."

लोकसाहित्य हा लोकजीवनाचा आरसा असते. लोकजीवनातून लोकसंस्कृतीची जडणघडण होत असते. त्यामुळेच लोकसाहित्याचे अध्ययन हे लोकसंस्कृतीचेच अध्ययन असते, असे म्हणता येते. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या दोन्हींचा विकास धर्माच्या अंगाने झालेला आहे. यांचे महत्वाचे कारण म्हणजे धर्म हा भारतीय जीवनाचा प्राण मानला गेला. त्यामुळे धर्माच्या अंगाने लोकसाहित्यात अनेक कृती – उक्ती स्वाभाविकपणेच आल्या आहेत. रूढी–प्रथा, लोकश्रध्दा विधी–विधाने, सण उत्सव, कला आणि लोकवाङ्मय इत्यादी बाबींची बैठक धर्मावरची आधारित असल्याचे स्पष्ट होते.

**लोकसाहित्यातील समाजजीवन :**

समाज आणि साहित्य यांच्यातील परस्पर संबंध अतूट असतात. साहित्यात समाजजीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते, तर समाजजीवनातून साहित्य आकारास येत असते. लोकसाहित्याच्या संदर्भातही असेच आहे. लोकसाहित्य म्हणजे पारंपारिक लोकजीवन पध्दती, लोकमानसाची अभिव्यक्ती, लोकश्रध्दा, लोकसमजुती, लोकभ्रम, लोकरूढी, लोकविधी, परंपरेने चालत आलेल्या प्रथा, आचार–विचार तसेच लोककला आणि मौखिक रूपातील शब्द अविष्कार इत्यादी बाबींचा समावेश लोकसाहित्यात होत असल्याने लोकसाहित्य लोकजीवनाला व्यापते, असेच म्हणता येते. मौखिक रूपातील शब्द लोकजीवनाला व्यापते, असेच म्हणता येते. मौखिक रूपातील शब्द आविष्कारात लोककथा, लोककथागीते, लोकगीते, आणि उखाणे–म्हणी यांचा समावेश होतो. लोकसाहित्य लोकजीवनाचा एक अविभाज्य घटक असते. लोकसाहित्यातून व्यक्त होणारे जीवन समाज जगत असतो. त्या साहित्यातून समाजजीवनाचा आविष्कार होत असतो. आणि समाजजीवनाला आकार देण्याचे कार्य लोकसाहित्याकडून घडत असते.

**लोकगीते :**

भारतात लोकगीतांची परंपरा फार प्राचीन आहे. समाज अस्तित्वात येऊन त्याचे सामूहिक जीवन झाले तेव्हापासूनच लोकगीतांची परंपरा अव्याहतपणे सुरू असावी. ज्या लोकसमुहात लोकसमुहात लोकगीत मौखिक परंपरेने प्रचलित असते. त्या समूहाच्या मानसाची आणि जीवनविशेषांची त्यात अभिव्यक्ती होते. मानवी जीवनाच्या सर्व अंगांच्या संदर्भासह लोकगीत अवतरते. धर्म, भाषा, विधी, इत्यादी समाजजीवनाच्या विविध अंगांशी संबंधित असलेल्या कार्याशी लोकगीते निगडीत असतात. बदलत्या समाजजीवनाबरोबर लोकगीतांतील आशय बदलत असला तरी समाजाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यांचे जतन लोकगीतांतून केलेले असते. आचार–विचार, सुखदु:खाच्या कल्पना, कुलाचार, रूढी, परंपरा यांचा अविष्कार लोकगीतातून झालेला दिसतो. खेड्यापाड्यांत राहणाऱ्या माणसांचा भोळेपणा, श्रध्दाळुपणा शालीनता, याबरोबरच दारिद्र्य, नैसर्गिक आणि मानवी आपत्तीमुळे सहन कराव्या लागणाऱ्या सुखदु:खाचेही चित्रण लोकगीतांत आढळते. प्रेम, शृंगार वात्सल्य, राग, द्वेष अशा भावभावनांचे चित्रण व्यक्त झालेले दिसते.

लोकगीतांचा आणि समाजामध्ये प्रचलित असलेल्या लोकप्रकटन संस्थांचा संबंध घनिष्ठ असतो. समाजामध्ये परंपरेने काही संस्था अश असतात की ज्यांच्यातून समाजमानस अभिव्यक्त होते. लोकाविष्कारांचे माध्यम असणाऱ्या पारंपारिक संस्थांपैकी भजन, कीर्तन, ललिते, विधिनाट्य, उत्सव इत्यादी प्रमुख होत. या माध्यमातूनच लोकगीते आकार घेतात. लोकगीतांच्या समाजजीवनातील कार्याच्या दृष्टीने त्याचे वर्गीकरण करण्यांची पध्दत आहे. लोकगीत कोण म्हणते? सर्वसाधारणपणे कोणत्या प्रसंगी म्हटले जाते? समाजजीवनातील कोणत्या कार्याशी, रूढीशी किंवा विधीशी ते संबद्ध असते? कोणत्या काळात म्हटले जाते? इत्यादी तपशील पाहून लोकगीतांचे वर्गीकरण करण्यात येते. यादृष्टीने लोकगीतांचे पुढील तीन स्थूल विभाग करता येतात.

१) विधिगीते : यात निरनिराळे विधी जसे जन्म, लग्न, मर्तिक आणि इतर संस्कार आणि उपनयन इत्यादींशी संबंधित गीते येतात.

२) श्रमगीते व रंजनपरगीते : ज्यात दळण, कांडण, मोट हाकणे, पेरणी, सोंगणी, गुरे चारणे ही किंवा अशा स्वरूपाची इतर कामे करताना म्हणावयाच्या गीतांचा अंतर्भाव होतो.

३) वर्षभरात निरनिराळ्या महिन्यात येणारे सण, उत्सव इत्यादी प्रसंगी म्हणण्यात येणारी गाणी (यात नागपंचमी, हादगा, भोंडला, गौरी, होळी, दसरा, दिवाळी, पोळा इत्यादी सणांच्या वेळी म्हटली जाणारी स्त्रीपुरूषांची गाणी येतात.)

**लौकिक गीते :**

शाहिरी रचना, समाजामध्ये रूढ असलेल्या आध्यात्मिक आशयाची गीते त्याचप्रमाणे भगतांची गाणी ही लौकिक गीते असतात. मराठी वाङ्मयातील भारूडे हा लौकिक काव्यप्रकार आहे. संतांनी अध्यात्मप्रचारासाठी भारूडांचा प्रभावी वापर केला समाजमनाचे त्यातून दर्शन घडविले. लौकिकगीत हे व्यक्तिनिर्मित असून त्यात निर्मात्याचे रचनाकौशल्य प्रकट होते.

**लोककथागीते :**

या प्रकाराच्या गीतांमध्ये समाजामध्ये प्रचलित असणाऱ्या रूढी परंपरांचे, समजुतींचे चित्रण आलेले असते. डाव्या पायाच्या अंगठ्याने दरवाजाला कुंकू लावणे, मांजर आडवे जाणे, लाकडाची मोळी घेऊन येणारी व्यक्ती समोरून येणे, सापाचे वेटोळे दिसणे, राक्षसिणी पीठ कांडताना दिसणे अशा अनेक समजुतींचे आणि अतिशययोक्त घटना प्रसंगांचे चित्रण पौराणिक कथगीतांमध्ये असते. मात्र या कथांच्याद्वारे लोकांच्या मनावर गंभीरपणे बोध केलेला असतो. अशा प्रकारच्या कथा ऐकून लोकांना कलानंदाची प्राप्ती होत असते. सामाजिक विषयावर आधारलेली अनेक कथा गीते प्रचलित आहेत. लोकसंस्कृतीचे उपासक, स्त्रियांची गाणी आणि इतर प्रसंगी पुरुषांनी सादर केलेली गाणी सामाजिक विषयावर आधारलेली असतात. समाजस्थितीचे स्थूल चित्रणही या कथांमध्ये आलेले असते.

**लोककथा :**

भारत हा कथा प्रिय देश आहे. लोकसाहित्यात लोककथांचे स्थान महत्त्वाचे आहे. लोक समूहाने निर्माण केलेल्या लोक कथांमधून समाजजीवनाचे प्रतिबिंब स्वाभाविकपणे आढळते. लोककथा अगदी प्राचीन काळापासून समाज जीवनाशी निगडित असल्यानेच तत्कालीन समाजजीवनाचे आणि अवशेषरूप लोक कथांमधून सापडतात सुरुवातीच्या दैवतकथा, परीकथांमधून समाज जीवनाचे चित्र अस्पष्ट जाणवते. बदलत्या काळानुसार, संस्कृती बदलाबरोबर कथा बदलत जाते. भाषा बदलते, त्यामुळे त्या–त्या काळातील समाजजीवनाचे अवशेष लोककथेत अंतर्भूत होत जातात. लोककथेतील समाज जीवन त्या–त्या प्रदेशाची निगडित असले तरी त्या–त्या प्रदेशातील धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक तपशील आतून मानवी जीवनाचे दर्शन घडत राहते. दैवतकथा, परिकथा, किंवा अद्‌भुतकथा, हास्य कथा, वीर कथा किंवा पराक्रम कथा, अनुभव कथा असे अभ्यासाच्या सोयीसाठी कथांचे वर्गीकरण करता येते.

समाजामध्ये निरनिराळ्या जातीत आढळणाऱ्या वैमनस्यावर आधारित विनोदी लोककथा अनेक आहेत. सावकार, पठाण यांच्या संबंधी तसेच युरोपात ज्यू लोकांसंबंधी अशा कथा प्रचलित आहेत. मराठी नाटकांत मारवाडी, भटजी यांची चित्रणे समाजामध्ये रूढ असलेल्या त्यांच्या संबंधीच्या कल्पनांच्या आधारेच येतात. विनोद निर्मिती आणि सामाजिक व्यंगावर बोट ठेवणे या दोन्ही बाबी येथे साध्य होतात. मराठी लोक कथेत न्हावी हा सतत बडबड करणारा, लावालावी करणारा, पोटात कोणतेही गुप्त गोष्ट ठेवू न शकणारा अशा दाखवलेला असतो. सोनार हाही अनेक कथांत विनोदनिर्मितीसाठी वापरला जातो.

ऐतिहासिक व्यक्तींच्या पराक्रमकथा परंपरेने समाजात चालत येतात. तंट्या भिल्ल, उमाजी नाईक यांच्या पराक्रमाच्या आणि शौर्याच्या कथा रूढ आहेत. समाज किंवा राष्ट्र यासाठी ज्यांनी बलिदान केले असेल त्यांच्या पराक्रमाच्या आठवणी अनेक कथा निर्माण करून ताज्या ठेवल्या जातात. आठवण करणे, आदर व्यक्त करणे, अभिमान बाळगणे, कौतुक करणे अशा अनेक प्रेरणा या लोककथांच्या निर्मितीमागे असतात.

लोककथांमधून तत्कालीन समाजजीवनाचे त्यांच्या मानसिकतेचे, धार्मिक समजुतीचे, संस्कृतीचे दर्शन घडते. तत्कालीन बोली. भाषेची वैशिष्ट्ये लक्षात येतात. त्यामुळे लोककथांचे महत्व अधिक आहे. लोककथा म्हणजे गतसंस्कृतीचा इतिहास आहे असे म्हणणे उचित ठरते.

**लोकनृत्ये :**

सामाजिक जीवनाचा अविष्कार लोकनृत्यात होत असतो. मानवी समूह जीवनाचा नृत्ये एक अविभाज्य भाग असतात. मनोरंजनाबरोबर भावनाभिव्यक्ती लोकनृत्यातून होत असते. लोकनृत्ये परंगरागत चालत आलेली, एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत सहज पोहोचणारी अशी असतात. लोकनृत्यांच्या अंत:प्रवाहाच्या अभ्यासाने समाजजीवनाच्या अंतरगाचे स्वरूप न्याहाळता येते. लग्नकार्याच्या निमित्ताने काही भागात गोंधळ घालण्याची प्रथा आहे. गोंधळ घालायच्या दिवशी देवीच्या कुलाचार करतात. रात्री जागरासाठी गोंधळ्यांना बोलावतात. हे गोंधळी कथागीते गाऊन व नृत्ये करून जागरण करतात. स्त्रियांची खेळाची नृत्ये, भंद्यांचे नृत्य, वीराचा नाच, फेराची नृत्ये, भिल्लांचे शिकारी नृत्य अशा विविध प्रकारच्या लोकनृत्यांतून विविध भूप्रदेशातील समाजजीवनाचा अविष्कार होतो. शारीरिक अवयवांच्या लयबध्द हालचालींद्वारे भावनांची ऊर्मी व्यक्त करणे हा लोकनृत्याचा मूळ हेतू असतो.

**म्हणी :**

दैनदिन व्यवहारात बोलीभाषेत म्हणी, वाक्प्रचार, कोडी इत्यादी गोष्टींचा अगदी सहजपणे उपयोग केलेला असतो. त्यातून बोलणाऱ्या व्यक्तीचा हजरबाबीपणा लक्षात येतो. व्यक्ती ज्या समाजात राहते त्या समाजाची सस्कृती म्हणींतून अभिव्यक्त होते. त्या त्या समाजातील मानवी जीवनव्यवहाराचे, कल्पनावैभव, परंपरा इत्यादी गोष्टींचे चित्रण म्हणीमधून झालेले असते. बोलणारा अगदी उत्स्फूर्तपणे अनेक अनुभवांच्या आधारे काही बोलून जातो. की जो हा अनुभव सार्वत्रिक असतो. हे जे बोलणे म्हणजे म्हण असते. जगातील बहुतेक साऱ्या भाषांत म्हणी आढळतात. संस्कृत, पाली भाषेत तसेच पंचतंत्र, हितोपदेश आदि ग्रंथातूनही नीती सांगणारी विधाने म्हणजेच म्हणी आहेत.

कोणतीही म्हण निर्माण झाली की तिचा समाजाकडून स्वीकार होणे अत्यंत आवश्यक असते. म्हणीतून कोण्या एकाच्या भावभावनेचा आविष्कार असून चालत नाही तर त्यातून समाजमनाचे प्रकटीकरण होणे आवश्यक असते. संस्कृती, निसर्ग, आचरण, नैतिकता इत्यादी गोष्टींशी म्हणीचा घनिष्ठ संबंध असणे अपरिहार्य असते. वेगवेगळ्या स्तरांतील माणसांच्या जीवनाचे चित्रण म्हणींमध्ये आलेले असते. म्हणींचे विषय, भाषा, स्थान, समाज, संस्कृतीनुसार भिन्नभिन्न असले तरी समाजाची रचना, आचार विचार, कुटुंबव्यवस्था इत्यादी गोंष्टीचे चित्रण म्हणींमध्ये असते. 'करावे तसे भरावे', 'माय मरो मावशी जगो', 'दैव देते अन् कर्म नेते', 'आयत्या बिळात नागोबा', 'ताकापुरते रामायण' अशा प्रकारच्या म्हणी आणि त्यामागे असलेल्या कहाण्या रंजक आहेत.

**समारोप :**

लोकजीवनाच्या परंपरा समजण्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो. त्या परंपरा विशिष्ट समाजाच्या असतात असे म्हणणे योग्य नाही. समाजात वागावे कसे या संबंधीचे अलिखित नियम आणि संकेत व्यक्तींना लोकसाहित्यातूनच कळतात. व्यक्तीकडून सामाजिक संकेतांचे व नियमांचे पालन होते. कोणते कृत्य समाजमान्य आहे व कोणते निषिध्द आहे यासंबंधीच्या कल्पना परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत लोकसाहित्याद्वारेच येत असतात. समाजमान्य कृत्यासंबंधी जाणीव होते. त्यामुळे देण्याचे कार्यही लोकसाहित्यातून घडत असते. लोकसहित्याला वळण देऊन आपल्या कार्यासाठी संतांनी ते वापरले त्यावरून लोक साहित्याच्या प्रचारमाध्यम म्हणून असलेल्या सामर्थ्याची कल्पना येते.

**संदर्भ साहित्य :**

१) तारा भवाळकर : लोकसंचित, पुणे, १९८९, पृ.३८
२) प्रभाकर मांडे : लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
३) डॉ. विश्वनाथ शिंदे : लोकसाहित्यमीमांसा, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.